# जालना एज्युकेशन सोसायटीचे
# इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी, जालना

## सुचना

कोविड-१९ साथीच्या कालावधीमध्ये ऑनलाईन पध्दतीने अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमधील उणिवा दुर करण्यासाठी, विद्यार्थ्यांची शैक्षणिक कमी भरुन काढण्यासाठी Bridge Course घेणे गरजेचे आहे. ऑनलाईन शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरीता त्यांचे शैक्षणिक नुकसान/ शैक्षणिक कमी भरुन काढण्याच्या दृष्टीने संस्थेत "सेतू अध्ययन उपक्रम" राबविण्याचे ठरवले आहे.

**उपक्रम राबविण्याची कार्यपध्दती**

१. सदर उपक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील डी.फार्मसी अभ्यासक्रमाच्या सुरुवातीला सर्व विषयांसाठी राबविण्यात येईल. सदर उपक्रम विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक असेल.

२. पूर्वज्ञानावर आधारित नवीन सत्रातील विषयज्ञान आकलन करण्यासाठी विषयज्ञान संकल्पना स्पष्टता, आकलन, उपयोजन, पृथःकरण/ संश्लेषण आणि टीकात्मक मुल्यमापन या स्तरांवर आधारित पूर्वज्ञान तपासणारी निदानात्मक चाचणी आयोजित करण्यात येईल.

३. विद्यार्थ्यांना आकलन न झालेले घटक निश्चित करुन सदरहू घटकासाठी गरजेप्रमाणे अध्यापन तासिकांचे वर्ग व अध्यापन पध्दतीचे नियोजन करुन समृध्द उपायात्मक अध्ययन-अध्यापन उपक्रमाची योजना तयार करण्यात येईल. यामध्ये ज्या विषयांना प्रात्यक्षिक Practical असतात अश्या प्रात्यक्षिकांचा सुध्दा समावेश असेल.

४. सदरहू उपक्रम समाधानकारकरित्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी संस्थेत येऊन नांवनोदणी करावी.

दि. २७/०८/२०२२

प्राचार्य

प्रत: १) मुख्य सुचना फलक
२) कार्यालयीन प्रत
३) व्हॉटस्ॲप प्रत